आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र
प्रशासकीय इमारत क्र 2, पहिला माळा, विंग – बी, सिव्हील लाइन्स, नागपूर
फोन नं : 0712-2551550/2551541 ई मेल-commissionermgnregsmah@gmail.com

क्रमांक आयुक्तालय/मगांराग्रारोहयोमहा/तांत्रीक/3344/2025 दिनांक 23.9.2025

प्रती,

जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (सर्व)

विषयः- मगांराग्रारोहयो अंतर्गत कामांसाठी ई-एम.बी प्रणाली राबविण्याबाबत

संदर्भः- 1) शा.नि. मग्रारोहयो-2020/प्र.क्र.47/रोहयो-10 दि. 13.4.2023
2) शासन परिपत्रक क्रमग्रारोहयो-2023/प्र.क्र.20/रोहयो-7 दि.25 जानेवारी 2023
3) आयुक्तालय/मगांराग्रारोहयोमहा/तक्रार/3179/2025 दिनांक 4.9.2025

केंद्र शासनाने मगांराग्रारोहयो अंतर्गत निर्मित कामांच्या मोजमापासाठी ई-एम.बी प्रणाली राबविण्याचे निश्चित केले आहे. सदर प्रणाली प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित तांत्रीक अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे तसेच प्रशिक्षणावेळी सादरीकरणाची प्रत देखील प्रशिक्षणार्थींना देण्यात आली होती. त्याचप्रमाणे संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये ई एमबी प्रणाली राज्यात राबविण्यात येणार असल्याबाबत सर्व जिल्ह्यांना अवगत करण्यात आले होते.

मगांराग्रारोहयो अंतर्गत संदर्भिय परिपत्रक क्र.2 नुसार कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची जबाबदारी व अधिकार याची विवेचना करण्यात आली आहे त्यानुसार ग्राम पंचायत/पंचायत समिती यंत्रणेसाठी प्रशिक्षीत तांत्रीक सहाय्यक (PTO) व इतर यंत्रणांचे तालुका पातळीवरील तांत्रीक अधिकारी (जि.प. बांधकाम, राज्य बांधकाम, मृद व जलसंधारण, जलसंपदा विभाग, तालुका कृषि अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी, वने तसेच सामाजिक वनीकरण ई.) यांची मगांराग्रारोहयो अंतर्गत कामांच्या हजेरीपत्रकाच्या मोजमापाची नोंदणी ई-एमबी प्रणालीवर करण्याची जबाबदारी राहील.

संदर्भिय शासन निर्णय क्र.1 अन्वये मगांराग्रारोहयो अंतर्गत कामांना तांत्रीक मान्यता प्रदान करण्याकरिता यंत्रणा/अधिकारी निर्धारित करून देण्यात आल्या आहेत. त्यानुसार नियुक्त तांत्रीक मान्यता प्रदान करणारे अधिकारी ई-एम.बी प्रणाली मध्ये तपासणी अधिकारी म्हणून देखील कार्यरत असतील.

ई-एम.बी प्रणाली राबविताना उक्त पध्दतीने जबाबदा-या पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन आपले स्तरावरून संबंधितांना निर्देश निर्गमित करण्या यावेत ही विनंती.

(डॉ.भरत बास्टेवाड, भा.प्र.से.)
आयुक्त
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार
हमी योजना महाराष्ट्र-नागपूर

प्रतिलिपी :- 1)मा. सचिव (रोहयो व मृद-जलसंधारण), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-32
2)मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख), नागपूर
3)मा.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
4)संचालक, महाराष्ट्र राज्य रेशिम संचलनालय, नागपूर
5)संचालक, मृद व जलसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे
6)सहआयुक्त (रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व
7)उपजिल्हाधिकारी (रोहयो) सर्व
8)उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. (नरेगा/पंचायत) सर्व